# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 02 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०२ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

संसदेच्या कामकाजाला आज सुरुवात होताच दोन्ही सभागृहात विरोधी पक्षाच्या सदस्यांनी एका उद्योगसमुहाचे कथित लाचखोरी प्रकरण तसंच संभल आणि मणिपूर परिस्थितीवर चर्चेची मागणी केली. या गदारोळातच लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास घेण्यास सुरुवात केली. गोंधळ वाढल्यानंतर लोकसभेचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्यानंतरही सदनातील गोंधळानंतर लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेतही विरोधी पक्षाच्या खासदारांनी याच मुद्यांवर चर्चेची नोटीस सभापतींना दिली. काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष आणि आम आदमी पक्षाच्या सदस्यांनी सदनात गोंधळाला सुरुवात केली. त्यानंतर राज्यसभेचं कामकाज सुरुवातील बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते उद्या आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त राष्ट्रीय दिव्यांग सशक्तीकरण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना नवी दिल्ली इथं होणाऱ्या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे.

****

यावर्षी नौदल दिनाच्या मुख्य कार्यक्रमाचं आयोजन ओडिशातील पुरी इथं करण्यात येणार आहे. परवा, चार डिसेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अध्यक्षतेखाली नौदल दिन साजरा करण्यात येणार आहे. नौदलप्रमुख ॲडमिरल डी के त्रिपाठी यांनी आज नवी दिल्ली इथं आयोजित पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली.

****

आरोग्य क्षेत्राला परवडण्याजोगं आणि सुलभ करण्याला केंद्र सरकार प्राधान्य देत असल्याचं केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. मांडवीय यांनी आज सकाळी नवी दिल्ली इथं माध्यमांना संबोधित केलं. देशात २०१४ मध्ये वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या ३८७ होती, ती आता ७८० एवढी झाल्याचं मांडवीय म्हणाले. आयुष्मान भारत प्रधानमंत्री आरोग्य योजना जगातली सर्वात मोठी आरोग्य योजना आहे. देशातल्या १२ कोटी नागरिकांना पाच लाख रुपयांपर्यंतचं आरोग्य कवच या योजनेमुळं मिळत आहे. तसंच या योजनेची व्याप्ती वाढवून ७० वर्षांवरील नागरिकांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे, असं मांडवीय यांनी सांगितलं.

दरम्यान, विकसित भारत युवा नेतृत्व संवादाचं आयोजन १२ जानेवारी या राष्ट्रीय युवा दिनी करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या कार्यक्रमाला संबोधित करणार आहेत तसंच युवकांशी संवाद साधणार आहेत, अशी माहिती मांडवीय यांनी दिली.

****

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात धोकादायक इमारतींचं २०२४-२५ या वर्षासाठी सर्वेक्षण करण्यात आलं आहे. सर्वेक्षणानंतर ५२७ इमारती धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. या इमारतींचा वापर तत्काळ थांबवण्यात यावा असं आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे. तसंच ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी असलेल्या इमारतींचं संरचना परीक्षण महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्यांकडून किंवा संरचना अभियंत्यांकडून करून घेणं अनिवार्य करण्यात आलं आहे. इमारतींचं संरचनात्मक परीक्षण येत्या ३१ मार्च पूर्वी पूर्ण करून याबाबतचा अहवाल सादर करावा, असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

****

यंदाच्या ऑक्टोबर महिन्यात यूनिफाइड पेमेंट्स इंटरफेस, यूपीआय च्या माध्यमातून महिनाभरात विक्रमी १६ पूर्णांक ५८ दशलक्ष रुपयांचे व्यवहार झाले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत युपीआय व्यवहारात ४५ टक्क्यांची वाढ झाली. ६३२ बँका युपीआयला जोडलेल्या आहेत.

****

इयत्ता पाचवी आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये ९ फेब्रुवारी या एकाच दिवशी पाचवी आणि

आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी शाळा नोंदणी आणि विद्यार्थी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी १७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यात वाढ करण्यात आली असून विद्यार्थ्यांना आता विलंब शुल्क, अतिविलंब शुल्क आणि अति विशेष विलंब शुल्कासह ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज भरता येणार असल्याचं राज्य परीक्षा परिषदेनं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात सांगण्यात आलं आहे.

****

भारतीय शेअर बाजाराला आज मोठ्या घसरणीसह सुरुवात झाली. बीएसई सेन्सेक्स ४७१.५१ अंकांच्या घसरणीसह ७९ हजार ३३१ अंकांवर उघडला. एनएसई निफ्टी निर्देशांक ११९.४५ अंकांनी घसरून २४ हजार ११ अंकांवर आला आहे. सकाळच्या सत्रानंतर निफ्टीमध्ये नंतर थोडी सुधारणा दिसून आली.

****

फेंजल चक्रीवादळ आणि कमी दाबाच्या पट्ट्याच्या पार्श्वभूमीवर केरळ आणि तामिळनाडूला पुढील चार दिवसांसाठी हवामान विभागानं रेड अलर्ट जारी केला आहे.

****